## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २४६५/२०२२

**अपिलार्थी, श्री.सदानंद एस. गणवीर**

अंबिका नगर, यवतमाळ ४४५ ००१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,
वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय भिवंडी,
वनोपज, विक्रीआगार भिवंडी, शांतीनगर रोड
कचेरीपाडा, ता.भिवंडी, जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक वनसंरक्षक
(रराप व वन्य) ठाणे वनविभाग, ठाणे,
ता.जि.ठाणे.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २१.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२२ | -- | ०९.०५.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २२.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने, आज पावेतो काहीच न कळविल्याने माहिती अप्राप्त असल्याने "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.गणेश सोनटक्के, सहाय्यक वनसंरक्षक (रराप व वन्य.) ठाणे उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्रीम.पुजा रक्टाटे, वनक्षेत्रपाल, भिवंडी (प्रादे.) यांचे प्रतिनिधी श्री.शेखर मोरे, वनपाल उपस्थित आहेत.

*" माहे ०१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ पावेतो या महिन्यात आपल्या रेंज कार्यालयाने संबंधित उपवनसंरक्षक वनविभागाकडून शासनाच्या योजनेअंतर्गत कामाकरीता प्राप्त एकुण धनादेशावरील रकमेची माहिती तसेच प्राप्त एकुण धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची माहिती तसेच बिल व बिलाच्या व्हाऊचरसह छायाप्रती उपलब्ध करुन देण्याबाबत.*

1) *१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत उपवनसंरक्षक वनविभाग ठाणे कार्यालयाकडून एकुण प्राप्त धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची सविस्तर माहिती व त्याचे बिल व बिलाचे व्हाऊचरची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देण्यात यावी.*
2) *१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत आपल्या रेंज कार्यालयाने उपवनसंरक्षक वनविभाग ठाणे कार्यालयाकडून एकुण प्राप्त रकमेची माहिती/RTGS द्वारा एकुण प्राप्त रकमेची माहिती जसे RTGS चा नंबर त्यावरील रक्कम व त्याचा दिनांक व बँकेच्या नावाची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देयात यावी."*

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी असे निवेदन केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.११.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, त्यांनी मागीतेलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्याने, कार्यालयात उपस्थित राहून, कार्यालयातील अभिलेख तपासून व छाननी करुन आवश्यक माहितीच्या कागदपत्रे शासकिय शुल्क भरुन सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत प्राप्त करुन घ्यावी.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी अतिशय स्पष्ट शब्दांमध्ये माहितीची मागणी केली आहे. सदर माहिती कश्या प्रकारे विस्तृत स्वरुपाची माहिती आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी कोणताही खुलासा करु शकले नाहीत. अशा परिस्थितीमध्ये अपिलार्थी यांना माहिती देण्यास टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे असे त्यांना कळवून कार्यालयामध्ये प्रत्यक्ष बोलावण्यात आले, असे दिसून

येते. अपिलार्थी यांनी त्यांचे अर्जामध्ये माहिती टपालाद्वारे पाठविण्यात यावी असे नमूद केले होते. अशी परिस्थितीत त्यांना आवश्यकता नसताना प्रत्यक्ष कार्यालयात बोलावणे ही कृती माहिती देण्यास टाळाटाळ करणारी आहे.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहितीपैकी वैयक्तीक स्वरुपाची माहिती वगळून, उर्वरित संपूर्ण माहिती पुरविणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहिती पैकी त्रयस्थ पक्षाची माहिती वगळून उर्वरित संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सागर आरडेकर, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय, भिवंडी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ३१.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०९.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई :४०० ६१४.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सागर आरडेकर,वनक्षेत्रपाल,वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय भिवंडी, वनोपज, विक्रीआगार भिवंडी, शांतीनगर रोडकचेरीपाडा, ता.भिवंडी, जि.ठाणे.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.पुजा रक्टाटे,
वनक्षेत्रपाल,वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय भिवंडी,
वनोपज, विक्रीआगार भिवंडी, शांतीनगर रोड
कचेरीपाडा, ता.भिवंडी, जि.ठाणे.**यांचे मार्फत प्रत रवाना**.